ग्रामविकास विभागाच्या प्रभावी दळणवळण सुविधांसाठी MY RDD ॲप्लीकेशन लॉंच करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३० /मातंक
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ.
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीख: १६ एप्रिल,२०१९

प्रस्तावना :

विभागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, शासनाची धोरणे ठरविण्यासाठी तसेच विधानमंडळाशी संबंधित कामकाज पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरून विविध माहितीची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावरही विविध प्रशासकीय बाबींसाठी शासनाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. यामध्ये अनेकदा विलंब होतो व कागदपत्रे खर्च होतात. कागदरहित व सुलभ प्रशासनासाठी तसेच विलंब टाळण्यासाठी या विभागामार्फत MY RDD हे ॲप्लीकेशन विकसित करण्यात आले आहे. यामध्ये विविध मोड्यूल्सचा सामावेश असून, सद्य: स्थितीत Policy Response मोड्यूल वापरासाठी तयार आहे. त्यानुसार प्रशासकीय कामात आणखी गतिमानता यावी यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय:

जिल्हा परिषदांकडून शासनाच्या धोरणांबाबत, योजनांबाबत तसेच शासन निर्णयांबाबत वेळोवेळी मार्गदर्शन अथवा शंका/ अडचणी उपस्थित करण्यात येतात. तसेच सदर धोरणांबाबत देण्यात आलेले स्पष्टीकरण/ मार्गदर्शन सर्व जिल्हा परिषदांना कळणे गरजेचे असते. सदरच्या शंकांचे/ अडचणींचे निरसन करण्यासाठी अधिक विलंब होऊ नये, तसेच तातडीने शासनाकडून सर्व जिल्हा परिषदांना मार्गदर्शन व्हावे, यासाठी विभागाकडून MY RDD ॲप्लीकेशन लॉंच करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सर्व जिल्हा परिषदांनी यापुढे मार्गदर्शन, शंका/ अडचणी इ. करिता फक्त MY RDD या ॲप्लीकेशन मधील Policy Response module चा वापर करावा. यासंदर्भात जिल्हा परिषदांकडून करण्यात येणाऱ्या कागदी पत्रव्यवहारावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येणार नाही .

२. MY RDD या ॲप्लीकेशनची लिंक व त्याचे user manual या विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. विभागाच्या वेबसाईटची लिंक https://rdd.maharashtra.gov.in/ अशी आहे. यासाठी जिल्हा परिषद/ आयुक्त/ राज्य व्यवस्थापन कक्ष यांचे लॉगीन शीट सर्व संबंधितांना ई-मेलवर पाठविण्यात आले आहे. प्रथम लॉगीन नंतर त्यांनी पासवर्ड बदलून घ्यायचा आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१६१७०७५८८३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.04.18 12:22:22 +05'30'

असीम गुप्ता
प्रधानसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सर्व सह सचिव/ उपसचिव/ कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय.मुंबई
२) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४) सर्व उपायुक्त (विकास) व उपायुक्त (आस्थापना),विभागीय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य
५) उप सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६) उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड नस्ती (माहिती तंत्रज्ञान कक्ष), ग्रामविकास विभाग , मंत्रालय.मुंबई